REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २६ जानेवारी, १९४४ अंक ४

**फणसपोळी, आंबेपोळी**
किरकोळ व ठोक मिळेल.
द. ना. हेर्जीब, : : २० शुक्रवार, पुणें २.

**ए. बी. सी. कॉइल्स**
( डासांच्या उदबत्त्या )
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.

**लायसॉफ**
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
**छाया** लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

**पुना गेस्ट हाऊस**
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

# विविध माहिती

### हिंदी बँकिंग परिस्थितीवर सर सी. डी. देशमुख ह्यांचा अभिप्राय

मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजच्या बँकिंग असोसिएशनच्या वार्षिक संमेलनाचे अध्यक्ष ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर सी. डी. देशमुख, ह्यांनीं हिंदी बँकांच्या परिस्थितीचा आढावा घेतला व युद्धसमाप्तीनंतरच्या संक्रमण काळांत त्यांचेवर पडणारा थोडाफार ताण त्या योग्य तऱ्हेनें सोसूं शकतील, असें आपलें मत त्यांनीं व्यक्त केलें. व्यापार व उद्योगधंदे ह्यांची बँकांकडील कर्जावरील मदार अल्प प्रमाणांत आहे, ह्या गोष्टीचाहि त्यांनीं उल्लेख केला. नव्या बँकांची व शाखांची स्थापना बँकिंगच्या सर्व-साधारण मजबुतीस बाधक आहे, असेंच कांहीं नाहीं; त्या चालविण्यास तज्ज्ञ लोक मिळण्यावर त्यांचें यश अवलंबून आहे परंतु अशा लोकांचा आजच तुटवडा भासत आहे, असें ते म्हणाले. प्रत्येक शाखा तात्काळ फायदा दाखवूं लागेल, अशी अपेक्षा न बाळगणें इष्ट होय, असेंहि त्यांनीं सांगितलें.

### विदेशी कपाशींतील सट्टेबाजीस आळा

ज्यांचेजवळ विदेशी कपाशीचा साठा आहे, अशांनीं आपला त्या कपाशीचा साठा १५ फेब्रुवारीस प्रारंभ करून त्यानंतर प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेस सरकारास कळविला पाहिजे व इजिप्शन कपाशीची खरेदी-विक्री सरकारी परवान्याशिवाय कोणीहि करतां कामा नये, असा जाहीरनामा हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. विदेशी कपाशींतील सट्टेबाजीस आळा घालणें, हा त्याचा उद्देश आहे.

### ट्रेझरी बिलांवर ८ आणे व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ८ आणे पडला.

### युद्धोत्तर वैमानिक वहातुक

क्युनार्ड स्टीमशिप कंपनी ह्या ब्रिटिश आगबोट कंपनीनें आपला मेमोरँडम बदलून, वैमानिक वहातुक करणें हा उद्देश त्यांत घालून घेतला आहे. इतर ब्रिटिश कंपन्यांनींहि त्याचा कित्ता गिरवला आहे. युद्धोत्तर वैमानिक वहातुक काबीज करण्याची ही पूर्वतयारी आहे.

### व्हाइसरॉयांच्या आवारासहि रेशनिंग लागू होणार

जुनी दिल्ली, नवी दिल्ली व दिल्ली कँन्टोनमेंट ह्यांत लवकरच रेशनिंगला प्रारंभ होणार आहे. व्हाइसरॉयांच्या आवाराचाहि रेशनिंगच्या योजनेंत समावेश केला जाईल व त्यांतील रहिवासी व इतर रहिवासी ह्यांत फरक केला जाणार नाहीं, असें कंट्रोलर ऑफ रेशनिंग, मि. ए. पी. ब्रूम, ह्यांनीं सांगितलें.

### हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

| | लक्ष रुपये |
|---|---|
| डिसेंबर, १९४२ | ३२८ |
| नोव्हेंबर, १९४३ | ४१८ |
| डिसेंबर, १९४३ | ४७६ |

### सर्वांत मोठा पगारदार

अमेरिकेंत सर्वांत ज्यास्त पगार मिळविणाराचें नांव मि. लुई बी. मेयर असें असून ते मेट्रो गोल्डविन स्टूडिओचे प्रमुख आहेत. गेलीं पांच वर्षें त्यांनीं सर्वांत मोठा पगारदार, हें आपलें स्थान कायम राखलें आहे. त्यांचा वार्षिक पगार सुमारें ३५ लक्ष रुपये आहे. परंतु, कर देऊन त्यांतील फक्त ५ लक्ष रुपये उरतात.

### साखर

साखर फक्त उसापासुनच करतां येते असें नसून बटाटे, तांदूळ, भाज्या, गवत, रद्दी कागद, जुने दोर, माती, ह्यांपासूनहि साखर निर्मूं शकते. अर्थात्, ह्या साखरेचा दर्जा व गोडी हीं कनिष्ठ असतात, हें उघड आहे. मधांत साखर असते, हें प्रसिद्धच आहे. द्राक्षांतहि साखर आढळते. परंतु, उस व बीट ह्यांची साखर मोठ्या प्रमाणावर करून तिचा प्रसार करणें फायदेशीर ठरतें.

शस्त्रसंन्यास !

बलीदानाचे प्रसंगी महात्मा विदुरांनी शस्त्रसंन्यास केला !
प्रत्येक प्राणीमात्रांत त्यांना परमेश्वर दिसूं लागला !

तो चमत्कार जरूर पहा !

रॉयल रत्न १८ वें

महात्मा विदुर

दिग्दर्शक:—रेजिसॉर पार्श्वनाथ आळतेकर | कला:—बाबूराव पेंटर

भूमिका:—विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे, मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता जव्हेरी.

आर्यन, पुणें दररोज ३। ६॥ व १०
रविवारीं सकाळीं १० वा. जादा खेळ

पुण्यांत ६ वा आठवडा

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २६ |
| २ सहकारी कर्जांच्या व्याजाचे दर ... | २७ |
| ३ विमा कंपनीच्या हप्त्यांच्या सवलतीची मुदत ... | २८ |
| ४ जर्मन गहाणाच्या बँकांचा कारभार ... | २८ |
| ५ स्फुट विचार ... | २९ |
| सोसायट्यांची देखरेख व तपासणी–त्यांच्या मर्यादा–श्रमविभाग व परस्पर सहाय-औद्योगिक उन्नतीची प्रचंड योजना–दहा हजार कोटि रुपये खर्च | |
| ६ शेअर बाजार ... | ३० |
| ७ को. कार्टेली ... | ३१ |
| ८ चलन व पैसा ... | ३१ |
| ९ परचेस व सेल युनियनची स्थापना ... | ३२ |

# अर्थ

बुधवार, ता. २६ जानेवारी, १९४४

## सहकारी कर्जांच्या व्याजाचे दर

### सहकारी पतपेढ्या आणि सेंट्रल बँका

खेडेगावी सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांस त्यांनीं घ्याव-याच्या कर्जावरील व्याजाचा दर भारी असून तो उतरणें आवश्यक आहे असें मत कित्येक वर्षे प्रतिपादलें जात आहे. पैसा पुरवणाऱ्या बँकांचा सोसायट्यांवर आकारण्याचा व्याजाचा दर कमी झाल्यावांचून हा उतार शक्य नाहीं हें उघड आहे. सोसायट्यांस दिलेलीं कर्जें अल्प मुदतीचीं असलीं तरी वेळेवर त्यांची फेड न झाल्यानें तीं लांबमुदतीचीं होतात आणि सूट व सवलत ह्यांचा आश्रय करावा लागतो. थकलेलीं व्याजें व मुद्दल सोडून देऊन सोसायट्या स्वतःच्या पायांवर उभ्या राहूं शकतील ह्या बेतानें तडजोड करणें बँकांस आवश्यक होतें. ही मूलभूत परिस्थिति लक्षांत घेतली असतां बँकांचें एकमेव नसलें तरी प्रमुख गिऱ्हाईक ज्या सोसायट्या, त्यांस अल्प व्याजानें कर्जें कां मिळत नाहींत, ह्या प्रश्नास उत्तर मिळतें. बँकांचा पैसा तरता व निश्चित-पणानें परत येणारा असा असता तर जॉईंट स्टॉक बँकांप्रमाणें सहकारी बँकांसहि आपला व्याजाचा दर हलका करतां आला असता. ह्या संबंधांत तुलना करावयाची तर ती शहरी मोठ्या बँकांशीं न करतां खेडेगावी सावकारांशीं केली पाहिजे. आतां, सहकारी चळवळीच्या बाहेर असणाऱ्या शेतकऱ्यांस जें व्याज द्यावें लागतें त्या मानानें पतपेढ्यांस त्यांच्या सभासदांस द्यावें लागणारें व्याज कितीतरी कमी असतें ही प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट असल्यानें तिला सिद्ध करण्यास निराळा पुरावा नको. शेतकऱ्यांशीं व्यवहार करणाऱ्या बँकांचा खर्च एवढा होतो आणि त्यांच्या मार्गांत वसुलीच्या इतक्या अडचणी असतात कीं त्यांस व्याजाचा दर विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे खाली नेणें परवडत नाहीं. सहकारी बँकांच्या व्यवस्थेंत पतपेढ्यांच्या प्रतिनिधींचा बहुतेक निर्णायक असा हात असतो आणि सोसायट्यांची बँकांच्या भांडवलांत महत्त्वाची भागीदारी असते हें येथें विसरतां कामा नये. ह्या कारणानें बँकांचें हित तें सोसायट्यांचें हित आणि सोसायट्यांचा फायदा तो बँकांचा फायदा अशी वास्तविक स्थिति आहे आणि ह्या दोन प्रकारच्या संस्थांमध्यें अनभिज्ञ किंवा पूर्वग्रह दूषित माणसांस वाटतें तसा परस्पर विरोध असणें शक्य नाहीं.

मामुली व्यवहारांच्या स्वरूपाची ही गोष्ट झाली. अलीकडे युद्धपरिस्थितीमुळें समाजांत मुबलक पैसा खेळत असून त्याचें मोल उतरलें आहे. सहकारी बँकांस नकोत इतक्या ठेवी त्यांचेकडे येत आहेत आणि ह्या पैशाचा विनियोग कसा करावा हें त्यांस समजेनासें झालें आहे. ह्या संस्थांनीं ठेवींवर द्यावयाच्या व्याजाचे दर पुष्कळच कमी केले आहेत, ह्यामुळें त्यांचा व्याजाच्या बाबीवरील खर्च पूर्वींपेक्षां खाली गेला आहे. त्याचाच अर्थ असा कीं बँकांनीं घ्यावयाचा आणि द्यावयाच्या दरांमधलें अंतर मोठें झालें आहे आणि शेती पतपेढ्यांस आकारावयाच्या व्याजाचा दर कमी करण्यास त्यांच्या प्राप्तीमध्यें कूस रहात आहे. ह्या अनुकूल परिस्थितींत कांहीं बँकांनीं सोसायट्यांस अंशभागी करण्याचें धोरण कमीअधिक प्रमाणांत स्वीकारलें आहे, तें हिशेबी पद्धतीच्या भक्कम पायावर उभें करणें आवश्यक आहे. येथें दोन गोष्टी मात्र ध्यानांत घेतल्या पाहिजेत. पहिली आणि महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं बँकांकडे स्वस्त दरानें ठेवी आल्या आहेत त्यांतला मोठा भाग सरकारी रोख्यांत, पैसा तरता ठेवण्यासाठी गुंतवावा लागत आहे आणि त्यावर अडीच-तीन टक्के इतकेंच व्याज सुटतें. म्हणजे, बँका घेत असलेल्या व देत असलेल्या व्याजाच्या दरांत, बऱ्याच मोठ्या रकमेचे बाबतींत, वाटतो तेवढा फरक रहात नाहीं आणि त्या मानानें त्यांची प्राप्ति मर्यादित होऊन सोसायट्यांस आकारावयाच्या व्याजांत घट करण्याचें त्यांचें सामर्थ्यहि मर्यादित होतें. तसेंच, युद्ध परिस्थितीमुळें बँकांच्या नोकरांच्या पगाराचा व इतर खर्च वाढला आहे ही गोष्टहि विसरतां कामा नये. शेतीच्या मालास चांगले भाव येत असल्यानें सोसायट्यांमध्यें कर्जें फेडण्याची व नवीन कर्जें मर्यादित प्रमाणांत घेण्याची प्रवृत्ति अभिनंदनीय रीतीनें दिसून येत आहे. शेतकऱ्यांनीं बचतीचा पैसा शिल्लक म्हणून गुंतवून ठेवावा, सध्यांच्या महागाईच्या काळांत त्याचा खर्च होऊं नये असा योग्य सल्ला त्यांस देण्यांत येत आहे, त्याच्या मुळाशीं वरील प्रवृत्तीच आहे. बँकांच्या व्याजाच्या प्राप्तीवर मात्र तिचा प्रतिकूल परिणाम होत आहे आणि त्याबद्दल त्यांनीं तक्रार करण्याचें कारण नाहीं. तथापि, बँकांनीं कर्जांवरील व्याजाच्या दराचा विचार कर्तव्य असतां ही बाब हिशेबांत घेतली पाहिजे. ज्या थोड्या बँकांनीं शेतमालाच्या तारणावर कर्जें देण्याचा व्यवहार वाढवला आहे, त्यांस आपला पैसा कर्जरोख्यांत गुंतविण्यापेक्षां अधिक किफायतशीर रीतीनें उपयोगांत आणण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे आणि सोसायट्यांस द्यावयाच्या मामुली कर्जांत होणारी घट भरून काढण्याची नवीन सोय झाली आहे. ज्या प्रमाणात हा व्यवहार वाढला आहे त्या मानानें बँकांच्या वर निर्दिष्ट केलेल्या तक्रारींस कमी जागा उरत आहे. मालाच्या तारणावर कर्जें देण्याचें काम दुहेरी रीतीनें उपयुक्त आहे. सोसायट्यांच्या सभासदांस आपल्या मालाच्या विक्रीची तरतूद सहकारी तऱ्हेनें करतां येऊन चांगला भाव मिळून लवकर पैसा हातीं येण्यास सहाय होत आहे. त्याबरोबरच, बँकांचा पैसा गुंतवण्याचें जादा साधन त्यांच्या हातीं येत असून सोसायट्यांस दिलेल्या कर्जांच्या वसुलीवर अनुकूल परिणाम होण्याचाहि हा मार्ग आहे. मध्यवर्ती बँका

सहकारी पतपेढ्यांस व इतर सहकारी संस्थांस पैसा पुरवण्याकरतांच अस्तित्वांत असल्यानें स्वतःच्या सुरक्षितेची काळजी घेऊन त्यांनीं हें आपलें कार्य शक्य तितक्या सवलतीनें व स्वस्त दरानें करणें अगत्याचें आहे. सर्व बँकांची ह्या बाबतींतली परिस्थिति सारखी नाहीं. तथापि, त्यांपैकीं प्रत्येक संस्थेस ठेवी अल्प दरानें मिळत आहेत, तोंपर्यंत सोसायट्यांस उतरत्या व्याजानें कर्जें देण्याची व्यवस्था करतां आली पाहिजे. ही व्याजाची सवलत बँकांच्या सांपत्तिक परिस्थितीचा नीट विचार होऊन निश्चित करण्यांत येणें आवश्यक आहे. हा प्रत्यक्ष हिशेबाचा प्रश्न आहे आणि तो व्यावहारिक रीतीनें सोडवतां येण्यासारखा आहे. वर म्हटल्याप्रमाणें, हें धोरण कित्येक बँकांनीं अंगिकारलें आहे. त्यास व्यवस्थित व हिशेबी स्वरूप बँकांनीं द्यावें हें उचित आहे.

## विमा कंपनीच्या हप्त्यांच्या सवलतीची मुदत

### कलकत्ता हायकोर्टाचा निवाडा

श्री. सुधीरचंद्र मलिक हे १० फेब्रुवारी, १९४१ रोजीं मरण पावल्यावर त्यांची पत्नी, श्री. वृंदाराणी देवी ह्यांनीं श्री. मलिक ह्यांच्या विम्याच्या रकमेची को-ऑपरेटिव्ह अॅशुअरन्स कं. लि. कडे मागणी केली. २० जानेवारी, १९४१ रोजीं विमा पॉलिसी, तिचा हप्ता न भरल्यामुळें, रद्द झाली तेव्हां कंपनी देणें लागत नाहीं, असें श्री. वृंदाराणी ह्यांना कळविण्यांत आलें. विमेदारास कोणताहि रोग नाहीं अशा प्रतिज्ञेच्या दाखल्याचे आधारावर कंपनीनें ५ फेब्रुवारी रोजीं पॉलिसी पुनः चालू केली होती, परंतु त्यास क्षयरोग होता असें नंतर आढळून आलें. ह्या संबंधांतील वैद्यकीय रिपोर्ट चुकीचा आहे असें वादीचें म्हणणें नव्हतें परंतु हप्त्याचे पैसे सवलतीच्या मुदतींत भरलेले आहेत असा वादीचा युक्तिवाद होता. विमा कंपनीची मुख्य कचेरी लाहोर येथें आहे व तिची कलकत्ता येथेंहि कचेरी आहे व तिच्या नोटपेपरवर कलकत्त्याच्या कचेरीचा पत्ता छापलेला असतो. ह्यावरून कंपनीचा कारभार कलकत्त्यास चालतो असें हायकोर्टानें ठरवून निवाडा केला.

विमेदाराच्या विम्याच्या हप्त्याची तारीख ६ जानेवारी ही होती. विमेदारास १५ दिवस सवलत मिळते, त्याप्रमाणें हप्ता भरण्याची असेरची तारीख २१ जानेवारी ही होती व त्याच दिवशीं हप्ता भरलेला आहे. ६ जानेवारीचा दिवस धरून सवलतीचे दिवस मोजावे अशी कंपनीनें मागणी केली व त्याप्रमाणें हप्त्यास एक दिवस उशीर झाला असें तिचें म्हणणें होतें. हप्ता येणें असलेला दिवस सवलतीची मुदत मोजतांना लक्षांत घ्यावयाचा नसतो, हें स्पष्ट करून विमेदारानें आपला हप्ता मुदतींत भरला, असा हायकोर्टानें निवाडा केला. विमा कंपनी विमेदारास दरमहा हप्त्याची नोटीस पाठवीत असे, त्यांत सवलतीची मुदत मोजतांना हप्ता येणें असलेला दिवस मोजला जाईल असें लिहिलेलें असलें तरी सुद्धा विमा कंपन्यांच्या संबंधांतील कागद व करार ह्यांत अस्पष्टपणा असल्यास कंपनीचे विरुद्ध त्याचा अर्थ लावावा, असा दंडक आहे. त्याचा आधार घेऊन हायकोर्टानें खालीलप्रमाणें निवाडा केलाः—

" ह्या कोर्टास दावा चालविण्याचा अधिकार आहे. १० फेब्रुवारी रोजीं पॉलिसी चालू होती. वादीस २ हजार रुपये व त्यावरील १० फेब्रुवारीपासूनचा बोनस व व्याज हें मिळावें. दाव्याचा खर्चहि भरून मिळावा "

## जमीन-गहाणाच्या बँकांचा कारभार

### कांहीं सूचना

सातारा जिल्हा जमीन गहाण बँकेच्या व्यवहारांचे अनुभवावरून सुचलेल्या विचारांचें एक टाचण श्री. बापूसाहेब राजाज्ञा ह्यांनीं तयार केलें आहे, तें श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनी आम्हांस दाखवलें. टाचणांतील प्रमुख बाबींचा उल्लेख येथें केला आहे. बँकेची स्थापना व घटना ह्यांची त्रोटक माहिती प्रथम देण्यांत आली आहे. बिगर कर्जदार ३८ सभासद असून त्यांचें भांडवल १५,२०० रुपये आहे आणि ८८० कर्जदार मेंबरांचें भांडवल १५,८५० रु. आहे. अशा प्रकारच्या मोठ्या भांडवलाची ही एकच बँक मुंबई प्रांतांत आहे. वाटेल तेवढीं कर्जें सर्वांस मिळतील ह्या समजुतीनें कर्जदार सभासदांनीं हें भांडवल घातलें आहे. पण विशिष्ट मर्यादा असल्या कारणानें थोड्या लोकांस कर्ज मिळू शकतें आणि तें मिळण्यासहि अर्ज केल्यापासून फार वेळ लागतो. ह्या बाबतींत सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. बहुतेक कर्जें जुन्या कर्जाच्या फेडीसाठी घेतलेलीं आहेत आणि जमीन सुधारणेकरितां घेतलेल्या कर्जाचें प्रमाण अत्यंत अल्प आहे. कर्जाचे अर्जांत यावयाची माहिती आणि तिची कायदेशीरपणाविषयींची छाननी ह्याचे संबंधांत पुष्कळ वेळ जातो, तो वाचवला जावा ह्याकरितां जरूर असलेल्या सुधारणा होणें इष्ट आहे. बँक सबंध जिल्ह्याकरितां असली तरी चांगल्या जमिनी व पाऊसपाणी बरें आहे अशा भागांतील लोकांसच तिचा उपयोग होतो आणि जमीनीचें क्षेत्र विशिष्ट मर्यादेपेक्षां अधिक असेल तरच तिचा फायदा शेतकऱ्यांस मिळू शकतो. मद्रास प्रांतांत जमीन गहाणाच्या बँका स्थापन होऊन अधिक वर्षे झालीं आहेत, तेथेंहि अनुभव अशाच प्रकारचा आहे. जमीन गहाण बँकांनीं दिलेल्या कर्जाचे हप्त्यांचे वसुलीसंबंधांत त्यांस विशेष सवलती असणें आवश्यक आहे. तडजोडीनें सावकारी कर्जांत सूट मिळवण्याची सध्याची व्यवस्था पद्धतशीर व नियमबद्ध अशी हवी. सुधारणेचे दृष्टीनें खालील सूचना करण्यांत आल्या आहेत:—सोसायटीचे जे मेंबर बँकेकडे कर्ज मागतात त्यांचे बाबतींत रिझर्व बँकेचें पुस्तक २ पान ३८ वरील सूचनेप्रमाणें माहिती आली पाहिजे. लँड व्हॅल्युएशन ऑफिसरनें सबरजिस्ट्रार कचेरींतील माहिती घेतल्यानंतर हप्त्याचे तारखेपर्यंत बोजांची माहिती योग्य फी घेऊन कां होईना सब-रजिस्ट्रारकडून वेळेवर मिळाली पाहिजे. गावकामगारांचें सहकार्य हवें. त्यांनीं जरूर ती माहिती व मदत दिली पाहिजे. बँकांची वार्षिक परिषद भरणें जरूर आहे. त्यांच्या बोर्डांत शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांचा समावेश व्हावा. बँकांचें ऑडिट मद्रासप्रमाणें मोफत असावें.

### मुंबई शहरांतील भिक्षेकरी बंद होणार ?

मुंबई शहरांत रस्त्यांवर भटकणारे भिकारी गोळा करून त्यांतील आंधळे, पांगळे व आजारी भिकारी योग्य त्या संस्थांत ठेवून व धडधाकट भिकाऱ्यांस कामधंदा शिकवून त्यांस पोटापाण्यास लावण्याची एक योजना मुंबई सरकार एका कायद्याचे द्वारा अंमलांत आणणार आहे. ह्या संबंधांत तपशीलवार सूचना करण्यासाठी एक लहान कमिटी नेमण्यांत आली आहे.

# स्फुट विचार

## सहकारी सोसायट्यांची देखरेख आणि तपासणी

सहकारी मध्यवर्ती बँकांनीं सोसायट्यांस हल्लींपेक्षा कमी व्याजाच्या दरानें कर्जें देण्याची आवश्यकता आणि शक्यता ह्या विषयाचें विवेचन आम्हीं आजच्या अग्रलेखांत केलें आहे. व्याजाचा दर उतरवणें त्यांस शक्य व्हावें म्हणून बँकांनीं स्वतः-च्या खर्चांत काटकसर करावी, अशी एक सूचना पुढें आली आहे. बाजवीपेक्षां अधिक खर्च होत असल्यास त्यास कात्री लावणें कोणत्याहि संस्थेच्या हिताचें असून काटकसरीनें स्वतःचा कारभार चालवणें तिचें कर्तव्यच आहे. सहकारी बँकांच्या मध्यवर्ती संस्थेनें ह्या सूचनेचा विचार केला आहे आणि चौकशीअंतीं खर्च कमी करण्यास जागा नसल्याचें तिला आढळून आलें आहे. सध्याच्या युद्ध परिस्थितींत महागाईमुळें तर सर्व खर्च वाढले आहेत आणि नोकरवर्गाच्या प्राप्तींत वाढ करणें अपरिहार्य झालें आहे. कागद, टपाल, छपाई हीं सर्व महागलीं आहेत. ह्या अडचणींवर अशी एक तोड सुचवली गेली आहे कीं सोसायट्यांची तपासणी करणारे बँकांचे इन्स्पेक्टर आणि त्यांची देखरेख करणारे सुपरव्हायझर ह्यांचीं कामें कांहीं बाबतींत एकाच स्वरूपाचीं असल्याकारणानें त्यांचे संबंधांत सुपरव्हायझिंग यूनियन्स व बँका ह्यांस दुहेरी खर्च करावा लागतो, त्यांत बचत करतां आली पाहिजे. आज असें झालें आहे कीं यूनिअन्सचा खर्च त्यांस मिळणारी सोसायट्यांची फी, सरकारी ग्रँट व बँकांची मदत ह्यांच्या उत्पन्नांतून भागत नाहीं. सुपरव्हायझरना योग्य महागाई भत्ता देणें तर जरुर आहे आणि तो द्यावयाचा म्हटल्यास यूनिअन्सच्या उत्पन्नांत त्यास वाव नाहीं. सरकार आपली ग्रॅन्ट वाढवून ही तूट भरून काढण्यास तयार नाहीं. तेव्हां बँकांनीं सध्याच्या त्यांच्या वार्षिक मदतींत पांच हजार रुपयांची भर घालून हा तुटीचा प्रश्न सोडवण्यास मदत करावी असा सहकारी खात्याचा आग्रह आहे. सोसायट्यांस दिलेल्या कर्जाच्या एकूण रकमेवर सध्याच्या शेकडा ४ आण्यांच्या ऐवजीं ६ आणे इतकी मदत बँकांनीं वाढवावी अशी ही सूचना आहे. सुपरव्हिजन व इन्स्पेक्शनचीं कामें अनुक्रमेंकरून यूनिअन्स व बँका ह्यांचे अधिकारी आज करीत आहेत. त्यांच्या कामाची जुळणी काटकसरीनें केली गेल्यास दोन्ही संस्थांच्या खर्चांत बचत होईल आणि त्याचा फायदा सोसायट्यांस मिळूं शकेल असा येथें युक्तिवाद केला जात आहे. यूनिअन्सचे सुपरव्हायझर्स कर्जाचे तक्के, त्यांची वसुली, जमीनींच्या किंमतींची आकारणी इत्यादि संबंधांत पर्यायानें बँकांचेंच काम करीत नाहींत काय ? मग यूनिअन्सच्या उत्पन्नास अधिक हातभार त्यांनीं कां लावूं नये ? आणि आपले इन्स्पेक्टर व सुपरव्हायझर ह्यांच्या कामांत जुळणी व काटकसर कां घडवून आणूं नये ? असे प्रश्न विचारण्यांत येत आहेत. देखरेखीचें काम यूनिअन्सच्या तंत्रानें चालण्याच्या ऐवजीं तें युनिअन, बँक व सहकारी खातें ह्यांच्या संयुक्त अधिकाराखालीं प्रयोगादाखल चालवलें जावें आणि त्याचा अनुभव अनुकूल वाटल्यास ही व्यवस्था सार्वत्रिक करावी अशीहि एक सूचना पुढ मांडण्यांत आली आहे.

---

## देखरेख आणि तपासणी ह्यांच्या मर्यादा

वरील विषय अत्यंत महत्त्वाचा, मूळभूत तत्त्वाचा व योग्य पद्धतीचा असल्यानें त्याची नीट चर्चा होणें अगत्याचें आहे. येथें त्यांत उपस्थित होत असलेले प्रमुख मुद्देच तेवढे नमूद करतां येतील. सोसायट्यांची देखरेख म्हणजे काय, ती कशी व कोणी करावयाची, तिच्या संबंधांत सोसायट्या व त्यांचे सभासद आणि यूनिअन्स व सुपरव्हायझर ह्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्यें कोणतीं, तसेंच, बँकेकडून होणाऱ्या तपासणीचा उद्देश व मर्यादा कोणत्या, तिचा युनिअननें करावयाच्या देखरेखीशीं संबंध किती व कोणता आहे, देखरेखीच्या खर्चास मदत म्हणून बँकांनीं कोणत्या कारणासाठीं व किती ग्रँट द्यावयाची, सरकारनें युनिअनला द्यावयाच्या ग्रॅन्टचें प्रमाण काय असावें व त्या संस्थेचें स्वतःचे फीचे वगैरे उत्पन्न वाढवण्याचे मार्ग कोणते, इत्यादि बाबी ह्या विषयाचा निर्णय करतांना विचारांत घेतल्या जाणें आवश्यक आहे. यूनिअन्स बँकांच्या कर्जाच्या वसुलीचें महत्त्वाचें काम करतात आणि म्हणून त्यांनीं त्या संस्थांस द्रव्यसहाय दिलें पाहिजे ह्या म्हणण्यांत कितीसा तथ्यांश आहे ? वस्तुतः बँक ही सोसायटी ह्या संस्थेस कर्ज देते, तिच्या सभासदांस नाहीं; आणि सोसायटी त्या पैशाची वांटणी, जरूरी व लायकी ह्यांस अनुसरून, आपल्या सभासदांमध्यें करते. सहकारी तत्त्वाप्रमाणें सोसायटीच्या सभासदांनीं एकमेकांच्या व्यवहारांवर नजर ठेवली पाहिजे आणि आपल्या संस्थेची पत बँकेकडे रहावी व तिच्याकडून वेळोवेळीं सवलतीनें कर्जें मिळावीं ह्यासाठीं सुपरव्हायझरमार्फत व्यवस्था व कारभार ह्यांवर देखरेख केली पाहिजे आणि कर्जाची वसूली केली पाहिजे. बँकेकडून कमी अधिक प्रमाणांत घेतलेल्या कर्जाची सभासदांकडून योग्य वसूली करणें हें सोसायटीचें स्वतःच्या हिताचें असें आद्य कर्तव्य आहे, तें तिला बँकेवर लोटून देतां येणार नाहीं.

---

## श्रमविभाग व परस्पर सहाय

सोसायट्या व त्यांचे सभासद ह्यांचेमध्यें स्वतःच्या जबाबदारीची जाणीव व शिस्त हीं असावींत तशीं नाहींत अशी हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीसंबंधानें नेहमीची तक्रार आहे. युनिअन्सचे सुपरवायझर व बँकांचे इन्स्पेक्टर ह्यांच्या कामाची गल्लत केल्यानें ही असमाधानकारक परिस्थिति अधिकच बिघडणार आहे. सुपरवायझर्सना स्वतःचें असें पुष्कळ काम आहे. त्यांस बँकेच्या इन्स्पेक्टरच्या कामाचा भाग आणखी उचलतां येणार नाहीं. तसेंच, इन्स्पेक्टरला सुपरव्हायझरचें दैनंदिन व चिकट काम जमावयाचें नाहीं. “ जेनो काम तेनो थाय ” हाच न्याय येथें लागू पडतो. यूनिअन्स व बँका ह्यांनीं शक्य तेथें परस्परांस मदत ही केलीच पाहिजे आणि सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठीं बँकांनीं यूनिअन्सना व सोसायट्यांस द्रव्यसहायहि दिलें पाहिजे. पण बँकांच्या एजंटांस व इन्स्पेक्टरांस स्वतःचें असें काम आहे तें सोडून किंवा कमी करून, सद्हेतूनें कां होईना, सोसायट्यांच्या अंतरव्यवस्थेंत त्यांनीं हात घालूं नये हें चांगलें. बँकांनीं सोसायट्या व यूनिअन्स ह्यांस मदत करावयाची ती मुख्यतः आपला व्याजाचा दर शक्य तेवढा कमी करून द्यावी हें उचित दिसतें. सहकारी संघटनांत श्रमविभागाचें तत्त्व आहे हें विसरून चालावयाचें नाहीं आणि त्याला धरून सर्व सहकारी संस्थांनीं परस्पर सहाय केलें असतां कर्तव्यें व जबाबदाऱ्या ह्यांचा गोंधळ उडणार नाहीं. प्रस्तुत दृष्टी ठेवून सहकारी कार्यकर्त्यांनीं वर नमूद केलेल्या प्रश्नांची चर्चा करावी. सरकारनें तरी स्वतःची यूनिअन ग्रँट सध्याच्या परिस्थितींत न वाढवतां बँकांस तसें करण्यास कां सांगावें ?

## औद्योगिक उन्नतीची प्रचंड योजना

श्री. बिर्ला, श्री. टाटा, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास इत्यादि प्रमुख हिंदी कारखानदारांनीं पंधरा वर्षांत पुरी व्हावयाची एक औद्योगिक प्रगतीची प्रचंड योजना ह्या देशाकरतां तयार करून प्रसिद्ध केली आहे. युद्धोत्तर काळांत केल्या जावयाच्या आर्थिक पुनर्घटनेची एक सर्वांगीण योजना हिंदुस्थान सरकारनें बनवावी अशी मागणी लोकांकडून केली जात आहे आणि त्या सरकारनें ह्या विषयाच्या चर्चेसाठी निरनिराळ्या समित्या नेमल्या आहेत. त्यांचें काम धिमेपणानें चाललें आहे आणि त्यांचा दीर्घसूत्रीपणा एक टीकेचा विषय होऊन बसला आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक योजनेची रुपरेखा तयार करणें हें पुष्कळ जिकीरीचें काम आहे ह्यांत शंका नाहीं आणि राष्ट्रीय योजना समिती ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या तज्ज्ञसमूहानें त्याचे दिशेनें कांहीं कार्य केलेंहि आहे पण त्याची प्रगति बंद झाल्यासारखें झालें आहे. तुम्ही सरकारला आर्थिक योजना तयार करावयास सांगतां तें काम तुम्हींच कां करीत नाहीं असा प्रश्न हिंदी औद्योगिक नेत्यांस विचारला जातो त्यास उत्तर म्हणून वर निर्दिष्ट केलेली योजना पुढें मांडण्यांत आली आहे. तिच्या प्रीत्यर्थ पंधरा वर्षांत दहा हजार कोटि रुपये खर्च व्हावे, अशी कर्त्यांची सूचना आहे.

---

## दहा हजार कोटि रुपये खर्च

हिंदी जनतेचें दारिद्र्य नाहींसें होऊन तिची रहाणी आधुनिक अपेक्षांस धरून वरच्या दर्जाची व्हावी हा प्रस्तुत योजनेचा हेतु आहे. आजवर चारपाचशें कोटि ही हिंदुस्थानांत फार मोठी रकम समजण्यांत येत असे. परंतु किंमतीमध्यें भलती वाढ, प्रचंड युद्धकालीन खर्च, चलनाचा बेसुमार विस्तार, इत्यादि कारणांमुळें शंभर दहा सारखें झाले आहेत. पैशाचें मोल सध्या उतरलें असलें तरी पंधरा वर्षांत दहा हजार कोटि रुपयांचा खर्च ही गोष्ट "उचलली जीभ लावली टाळयाला" ह्या विलक्षण स्वरूपाची आहे असें अनेकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. तथापि हिंदुस्थानचें दारिद्र्य व आर्थिक दुःस्थिति ह्यांचा रोग इतका दृढमूल आहे कीं त्यांच्या उच्चाटनास उपायहि जालीम पाहिजे ह्या विचारसरणीचा अवलंब पुढें आलेल्या औद्योगिक योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं केला असला पाहिजे. एकूण दहा हजार कोटि रुपयांपैकीं ४४८० कोटि उद्योगधंद्यांवर, १२४० कोटि शेतीवर, ९४० कोटि रस्त्यांवर, ४९० कोटि शिक्षणावर, ४५० कोटि आरोग्यावर, २२०० कोटि घरांच्या पुरवठ्यावर व २०० कोटि किरकोळ बाबींवर खर्चले जावयाचे आहेत. खर्चाची ही व्यवस्था ठीक आहे, पण असल्या अवाढव्य रकमा उभ्या कशा करणार? ह्या प्रश्नास योजनेच्या कर्त्यांचें उत्तर पण आहे. लोकांची शिलकी बचत, बाहेरील कर्जे, हिंदुस्थानची लंडनमधली जमलेली शिल्लक व चलनांत वाढ असल्या मार्गांनीं आवश्यक असलेला पैसा गोळा व्हावयाचा आहे. ह्या योजनेवर टीका करण्यास आणि तींत दुरुस्त्या सुचवण्यास अर्थातच पुष्कळ जागा आहे आणि अशी विधायक टीका व्हावी अशी आराखड्याच्या निर्मात्यांची इच्छाहि आहे.

---

## शेअर-बाजार

(ले. श्री. ब. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. २४ डे. जि. पुणें ४)

मॉडेल नागपूर गिरणी कोळशाच्या अभावी बंद ठेवण्यांत आली आहे यामुळें साहजिकच कोळशांच्या खाणींची तरी काय परिस्थिति या युद्धांत आहे याकडे लक्ष वेधलें जातें. नुकतेंच खाणीमध्यें स्त्रियांना उतरूं द्यावें यावर पार्लमेंटांत प्रश्नोत्तरें होऊन अमेरी साहेबांना आपली बायको घेऊन आपण खाणींत खाली जाल काय? इत्यादि प्रश्न ऐकावे लागले.

मागील वर्षी कोळशाचा तुटवडा भासत होता त्याचें कारण वाघिणींचा पुरवठा, इतर माल, सैन्य, वगैरे वाहतुकीच्या दडपणामुळें कमी पडून खाणीच्या माथ्यावर माल पडून राहात होता. वाचकांना स्मरत असेल कीं सिमेंटचा शेअर एकदा याच बातमीवर २२९ वरुन २०९पर्यंत येऊन गेला होता. त्यानंतर परीस्थिति अशी झाली होती कीं कधीं वाघिणींचा तुटवडा तर कधीं कोळशाच्या उत्पादनांतच घट त्यामुळें वाघिणी मोकळया पडून धंद्यांना अपुरा कोळसा, त्यांतच दामोदर नदीचें धरण फुटून वाहतुकीस अडथळा आणखी आला. कोळशाच्या उत्पादनांतच घट सुरु झाल्यास हिंदुस्थानच्या सर्व उद्योगधंद्यांस, वाहतुकीस, वीज उत्पादनास व इतर जिव्हाळयाच्या हालचालींस धोका उत्पन्न होतो व युद्ध प्रयत्नास कोठल्याही राजकीय आंदोलनामुळें उत्पन्न होणार नाहीं इतका अडथळा निर्माण होतो. यां घटीचें एकच कारण म्हणजे मजुरांचें निर्गमन.

जर जमिनीच्या पृष्ठावरच राहून काम करतां आलें व पोटाला मिळालें तर पृथ्वीच्या पोटांत, उष्णतेंत, अंधारांत, धोक्याच्या जागेंत जाऊन काम करण्याची जरूरी काय? जेव्हां युद्ध नव्हतें तेव्हां सगळीकडेच नोकरीचा नन्ना म्हणुन खाणीला भरपूर मजूर मिळणें शक्य असतें. पण युद्धामुळें सैन्यांत, वरच्या कारखान्यांत मजुरांना भरपूर मागणी आल्यानें व सर्वांत महत्वाची गोष्ट अन्नाचा तुटवडा सुरू झाल्यानें खाणींच्या मजुरांचें निर्गमन सुरू झाल्यास नवल नाहीं.

तेव्हां आतां सरकारचा व खाणी मालकांचा मजुरांची संख्या कायम राखण्याकरतां आटापिटा चालू आहे. मुख्यतः व्यवस्थित अन्न पुरवणें, शक्ती व प्रकृति चांगली राखण्याकरतां औषधपाणी देणें इत्यादि उपाय चालू आहेत आणि नुकतीच तुटवडा भरून काढण्याकरतां १९२४ सालापासून करण्यांत आलेली स्त्रियांना खालीं उतरण्याची बंदी दूर करण्यांत आली आहे व त्यामुळेंच सर्व देशभर दुसरी एक असमाधानाची लाट उत्पन्न झाली आहे. स्त्रियांना खाणींत काम करू द्यावें कीं नाहीं हा जो वाद चालला आहे त्यांत स्त्रियांच्या शारीरिक मर्यादा, नवरा–बायको संबंधाचा एकाद्या न्यायालयांत चालतो त्याप्रमाणें चाललेला चिवडा, इत्यादि गोष्टी वाचणें हें भांडवली साम्राज्याचें स्वरूप समजण्याचे दृष्टीनें उद्‌बोधक व मनोरंजकही आहे. असो.

खाणींचे सर्व शेअर अत्यंत तेजींत आहेत. इकडील मंडळींनीं लक्ष घालण्यासारखे शेअर्स सांगावयाचे तर बंगाल कोल, अमलगमेटड, (४६१) व्या. १ रु. स. मा. इक्विटेबल, (५५ व्या. ८अ. स. मा.) इत्यादि होत. अजून व्याज नाहीं असा तालचेर करून ठेवण्यास हरकत नाहीं. बंगाल कोल ही शंभर वर्षे चाललेली कंपनी आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. याचा शंभराच्या शेअर्सचा भाव ६०५ पर्यंत असून बावीस रुपये करमाफ व्याज मिळतें.

## बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

### शेती सुधारणा : रशियन व सहकारी पद्धत

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें प्रसिद्ध होणाऱ्या वरील त्रैमासिकाच्या ताज्या अंकांत प्रारंभीं रशियांतील शेतीचें उत्पादन व शेतकऱ्यांचें जीवन ह्यासंबंधांतील संघटना व संघटनेची सहकारी पद्धत ह्यांची तुलना करणारा प्रो. काळे ह्यांचा एक विस्तृत लेख छापण्यांत आला आहे. हिंदुस्थानास शेतीचें उत्पादन व अन्नपुरवठा ह्यांची वाढ करावयाची आहे तर मग उत्पादनाच्या सध्याच्या जुन्या पुराण्या शेतीच्या पद्धतीचे ऐवजी रशियन पद्धत सुरू करण्यास हरकत कोणती ? ह्या प्रश्नाची साधक बाधक चर्चा त्या लेखांत करण्यांत आली आहे. रशियांतील सामुदायिक शेतीची पार्श्वभूमि, तिचा इतिहास, तिचे परिणाम इत्यादींची इतर देशांतील सहकारी पद्धतीशीं तुलना करतां, सहकारी चळवळीची उपयुक्तता व तिचें सर्वांगीण महत्त्व अधिक आहे, असें प्रो. काळे यांनीं सांगितलें आहे. हिंदुस्थानांत सहकारी चळवळीचे सुपरिणाम उत्कटतेनें दिसून येत नाहींत हें खरें; परंतु त्याचें कारण ध्येयनिष्ठ, उत्साहपूर्ण, सतत व एकजुटीच्या प्रयत्नांचा अभाव हेंच आहे असें दिसून येईल व ह्याच संबंधांत मात्र रशियन प्रयत्न आदर्श आहेत असें लेखकानें दर्शविलें आहे. सहकारी क्षेत्राचा व्याप वाढून त्यांत शेतीच्या धंद्याच्या व शेतकऱ्यांच्या जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश झाला पाहिजे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व शेती ह्यासंबंधांतील परिषदेनें लोकांच्या आर्थिक सुधारणेसाठी प्रत्येक राष्ट्रानें कसून प्रयत्न प्रयत्न केले पाहिजेत असें सांगितलें आहे, त्याकडे लक्ष वेधून प्रो. काळे ह्यांनीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांची त्याविषयक जबाबदारी सूचित केली आहे. प्रो. काजी ह्यांचें मुंबई येथील सहकारी दिनाचे प्रसंगीं झालेलें भाषण व श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा " दि सोशल वेल्फेअर "मधील " खेडेगांवांतील धान्याच्या बँका " हा लेख हीं उद्धृत करण्यांत आलीं आहेत. सहकारी चळवळीस जोमाची चालना देण्याची योजना श्री. एम. एस. कुळकर्णी ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे. ग्रंथावरील अभिप्राय, ताजीं प्रकाशनें, संपादकीय स्फुटें, सहकारी बातम्या, इन्स्टिट्यूटचें कार्य इत्यादि नेहमीचीं सदरें अंकांत आहेतच.

---

### चलन व पैसा ह्यासंबंधांतील युद्धोत्तर धोरण

युद्धोत्तर पुनर्घटनेच्या दृष्टीनें सर्वसाधारण योजना ठरविणाऱ्या, हिंदुस्थान सरकारच्या जनरल पॉलिसी कमिटीची बैठक दिल्ली येथें नुकतीच भरली होती. त्या बैठकींत चलनविषयक प्रश्नावर चर्चा झाली. संयुक्त राष्ट्रांपैकीं कोणत्याहि इतर राष्ट्राप्रमाणेंच हिंदुस्थानाहि पैसा व चलन ह्या संबंधांत स्वतःचें धोरण आखण्यास स्वतंत्र आहे व हिंदी लोकमतानुसार मध्यवर्ती सरकार निर्णय करून धोरण ठरवील, त्यांत भारतमंत्री ढवळाढवळ करणार नाहींत, असें आश्वासन हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेसमन ह्यांनीं सदर बैठकींत दिलें. हिंदुस्थानाचें इंग्लंडमधील येणें लवकर व व्यवस्थितपणें कसें वसूल करण्यांत येईल व रुपया-पौंडाची हुंडणावळ कशी ठरविली जाईल, ह्यावरूनच फडनवीसांच्या आश्वासनाची खरी किंमत कळून येईल, असें त्यावर कित्येक सभासदांनीं भाष्य केलें. युद्धोत्तर योजनांचे बाबतींत हिंदुस्थान सरकारची हालचाल फारच सावकाश होत असल्याविषयींहि तक्रार कमिटींत करण्यांत आली.

### सातारा स्वदेशी कमर्शिअल कं. लि.

वरील बँकेस ३० जून १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ३,५८२ रुपये नफा झाला. साधारण भागीदारांस ८% डिव्हिडंड मिळालें. कंपनीकडे जमा असलेल्या ठेवींच्या मानानें भांडवल व रिझर्व्ह हीं कमी आहेत म्हणून रिझर्व्ह फंडांत भर घालण्याचें व भांडवलांत वाढ करण्याचें बोर्डाचें धोरण आहे. कंपनीचे १४ लक्ष रुपये इनव्हेस्टमेंट खातीं असून लोकांकडील येणें १० लक्ष, ६२ हजार रुपये आहे.

### बेळगांव जिल्हा सें. को. बँकेची ज्युबिली

बेळगांव जिल्हा सें. को. बँकेचा रौप्यमहोत्सव ता. ७ फेब्रुवारी रोजीं साजरा होणार आहे. पूर्वी बेळगांव जिल्ह्यांतील सहकारी सोसायट्यांस मुंबई प्रांतिक सहकारी बँक कर्जे देत असे. १७, डिसेंबर १९१८ रोजीं जिल्हा सें. को. बँक नोंदण्यांत आली व तिनें १३½ हजार रुपयांचें खेळतें भांडवल व २६ व्यक्ती आणि ९ सोसायट्या मिळून ३५ सभासद ह्या स्वरूपांत कामास प्रारंभ केला. ३०-११-४३ च्या आकड्यांप्रमाणें बँकेचें वसूल भांडवल २,७०,९०० रुपये, रिझर्व्ह आणि इतर फंड २,४०,९७९ रुपये, ठेवी ३०,२८,३८७ रुपये, सोसायट्यांकडील येणें ७,६१,५५४ रु., व्यक्तींकडून येणें १२,९५,२४४ रु., असा तिच्या व्यवहाराच्या प्रगतीचा तपशील आहे. १९४२-४३ मध्यें बँकेस ३७,६८१ रुपये नफा झाला व भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें. बँकेच्या २५ वर्षांच्या प्रगतीबद्दल तिचें अभिनंदन करून आम्ही तिची आणखी भरभराट होवो, असें चिंतितों. श्री. पी. बी. अगरगोळ, बी. ए., एल.एल.बी. हे बँकेचे अध्यक्ष आहेत.


बॉम्बे को-ऑपरेटीव
इन्शुअरन्स सोसायटी लि.

सहकारी संस्थांच्या सभासदांस विशेष सवलत

एकंदर कामकाज ... १। कोटीहून अधिक
एकूण मालमत्ता ... १८ लाखांहून अधिक
आयुर्विमा फंड ... १६ लाखांहून अधिक

एजन्सीच्या अटी अगर पॉलिसीच्या विशेष माहितीकरितां
चौकशी कराः—

मुख्य ऑफिसः—

को-ऑपरेटीव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशाहा मेथा रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानच्या आघाडीवरील
सहकारी विमा संस्था

## जेऊर येथें करमाळा तालुका अग्रि. को. परचेस अँड सेल युनिअन लि. ची स्थापना

सोलापूर जिल्ह्यांतील करमाळा तालुक्यांत सहकारी सोसायट्यांची वाढ जशी व्हावयास पाहिजे तशी झाली नाहीं असें तेथील स्थानिक पुढाऱ्यांना व सहकारी खात्यांतील अधिकाऱ्यांना वाटूं लागलें होतें. तशा परिस्थितींत या तालुक्यांतील मध्यवर्ती असणारें रेल्वे स्टेशनचें गांव जेऊर येथें सहकारी खरेदीविक्री संघ स्थापन केल्यास या तालुक्यांतील शेतकरी वर्गाची सोय होणार असून नवीन सोसायट्या स्थापन होण्याचे कामीं या संघाची बरीच मदत होईल या उद्देशाने या तालुक्यांतील स्थानिक पुढारी, श्री. गणपतराव पाटील, यांनीं याबाबत गेल्या महिन्यांत मे. असि. रजिस्ट्रारसाहेब यांचेशी बरीच वाटाघाट केली. पोट नियमांचा मसुदा केल्यानंतर शेअर भांडवल जमवावयास सुरवात होऊन आतांपर्यंत रु. सात हजारचें शेअर भांडवल जमविण्यांत आलें व लौकरच ही रक्कम रुपये दहा हजारचे वर जाईल अशी अपेक्षा आहे.

या संघाचा उद्घाटन समारंभ व पहिली साधारण सभा तारीख ६–१–४४ रोजीं जेऊर येथें मोठ्या थाटानें व उत्साहानें पार पडली. श्री. गणपतराव पाटील यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. सहकारी चळवळीचा थोडक्यांत इतिहास सांगून सहकारी सोसायट्यांबद्दल शेतकरी समाजामध्यें जे गैरसमज निर्माण झाले आहेत त्यांचें त्यांनीं निराकरण केलें. तसेंच, या खरेदीविक्री संघानें शेतकऱ्यांचा कोणत्या प्रकारें फायदा व्हावयाचा आहे याबद्दल त्यांनीं कळकळीचें भाषण केल्यानंतर संघाचें उद्घाटन करण्यास मे. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांना विनंती केली.

मे. के. आर. कुलकर्णीसाहेब, असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. सोलापूर, यांनीं टाळ्यांचे गजरांत संघाचें उद्घाटन जाहीर करून अशा खरेदीविक्री संघांची उपयुक्तता पटवून दिली. अशा प्रकारचे संघ कर्नाटक, खानदेश वगैरे जिल्ह्यांत कशा प्रकारें लोकोपयोगी कामें करीत आहेत याचें वर्णन करून अशा प्रकारचा संघ काढल्याबद्दल स्थानिक पुढाऱ्यांचें त्यांनीं अभिनंदन केलें. या संघास पांच मैलांचे आंतील शेतकऱ्यांना पीक निर्माण करण्यासाठीं बीं बियाणें, बारदान कर्ज देतां येतील हें या संघाचें वैशिष्ठ्य आहे हें त्यांनीं नमूद केलें.

उद्घाटन समारंभानंतर त्याच ठिकाणीं तालुक्याचे मामलेदार, मे. महंमद उस्मानसाहेब, यांचे अध्यक्षतेखालीं या संघाची पहिली साधारण सभा भरली. सभेंत पोट नियम मंजूर करण्यांत येऊन पंचकमिटीची निवड करण्यांत आली व तेथील स्थानिक पुढारी, मि. हुंडेकरी, यांची सो. चे चेअरमन म्हणून एकमतानें निवड झाली. यानंतर मार्केटिंग इन्स्पेक्टर, डि. को. ऑफिसर व सेंट्रल बँकेचे मॅनेजर यांनीं समयोचित भाषणें केल्यानंतर अध्यक्षांनीं शेतकऱ्यांना अशा उपयुक्त संस्थेचे शेअर्स शक्य तितक्या लवकर खरेदी करण्यास विनंती केली. तसेंच, ही संस्था जसजशी उपयुक्त कामगिरी करण्यास सुरवात करील तसतशी लोकप्रियता मिळवूं शकेल व अशा संस्थेस सरकार योग्य ती मदत करण्यास तयार होईल असें आश्वासन दिलें. अध्यक्षांचे भाषणानंतर, हारतुरे अर्पण करण्यांत आले व सभा बरखास्त झाली.

या समारंभाचे वेळीं श्री. पवार यांनीं सर्व लोकांस सहज समजतील अशीं उपदेशपर पदें उत्तम रीतीनें गाऊन दाखवलीं व लोकांचें मनोरंजन केलें. श्री. पवार ह्यांस, सहकारी चळवळीसंबंधानें अगर ग्रामसुधारणेसंबंधानें कविता केल्यास त्यांचा चांगला उपयोग होईल.


**दत्त कंपनी**

७२५ शुक्रवार पेठ, पुणें २. डाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

**दि इंडियन रियल इस्टेट कार्पोरेशन लिमिटेड**

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

–ठेवी घेणें आहेत–

| मुदत | | दर | |
|---|---|---|---|
| ६ | महिने | ४ | टक्के |
| १२ | ” | ४॥ | ” |
| २४ | ” | ५ | ” |

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

**तुमची ताई !**

छकुल्यांनो– चिमुकल्यांनो–
छोट्या प्रेक्षकांनो–
लुकलुकती चिमणे डोळे। जिभली ही बुडुबुडु बोले
वासंतीचें गोड गाणें तुम्हांस फार आवडेल !

**–१३ वा आठवडा–**

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

**रामराज्य**

दिग्दर्शक—विजय भट्ट
भूमिका—शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहोनी.

**मिनर्व्हा, पुणें**

वेळा रोज—६॥ व १० वा.
दर शनि. रवि. सोम. व इतर सुटींचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.